Historicity Research Journal
Volume 1 | Issue 7 | March 2015 ISSN:- 2393-8900

**Research Article**

# भगतसिंग यांच्या कार्याची दुर्लक्षित बाजू

**संदीप संभाजी तारदाळकर**

विभाग प्रमुख, इतिहास विभाग, तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती.

***सारांश :***

ब्रिटीश राजवटीपासून स्वातंत्र्य मिळविण्यासाठी भारतात जी चळवळ चालली तिचे वैचारीक धारणा व कार्यशैलीच्या दृष्टीने प्रामुख्याने चार प्रवाह दिसतात. मवाळ, जहाल, गांधीवादी व क्रांतिकारक हे ते चार प्रवाह होत. राष्ट्रीय काँग्रेसमधील मवाळ नेत्यांची भिक्षुकी वृत्ती आणि जहाल नेत्यांना सकारात्मक नेतृत्व बहाल करण्यात आलेले अपयश यामुळे इ.स. १९०७ च्या अखेरीस एक नवा राजकीय प्रवाह पुढे आला. अधिर झालेल्या भारतीय तरुणांनी वैयक्तिक साहसाचा व क्रांतिकारी-दहशतवादाचा मार्ग अवलंबिला.

***प्रस्तावना :***

" भारतातील तीस कोटी जनतेने आपले साठ कोटी हात दडपशाहीचा शाप नष्ट करण्यासाठी वापरले पाहिजेत. बळाचा प्रतिकार बळानेच झाला पाहिजे" या विचारांनुसार ही क्रतिकारी चळवळ सुरू झाली.[१] अप्रिय ब्रिटिश अधिका-यांचा वध करणे, त्यामुळे राज्यकर्ते भयभीत होतील आणि लोकांमध्ये देशभक्ती जागृत होऊन, राज्यकर्त्याविषयी भीती न बाळगण्याची प्रेरणा त्यांना मिळेल, असा या तरूणांचा होरा होता. भगतसिंग हे सुद्धा या क्रांतिकारी चळवळीकडे ओढले गेले होते.

**भगतसिंग यांचे लोकप्रिय असलेले कार्य :**

सर्वसामान्यपणे भगतसिंग हे त्यांच्या क्रांतिकार्यासाठी भारतीयांत प्रसिद्ध आहेत. ३० ऑक्टोबर, १९२८ रोजी लाहोर येथे सायमन कमिशन विरोधातील निदर्शनावर झालेल्या निघृण लाठीहल्ल्यात जखमी होऊन लाला लजपतराय मरण पावले. परिणामी, १७ डिसेंबर, १९२८ रोजी भगतसिंग, चंद्रशेखर आझाद व राजगुरू यांनी लजपतराय यांच्यावरील लाठीहल्ल्यास जबाबदार असलेल्या सॉंडर्स या पोलीस अधिका-याची लाहोर येथे हत्या केली. तसेच ८ एप्रिल, १९२९ रोजी केंद्रीय कायदेमंडळात मांडण्यात येणा-या 'पब्लिक सेफ्टी बिल' व 'ट्रेड डिस्प्यूट बिल' या विधेयकांना विरोध दर्शविण्यासाठी भगतसिंग व बटुकेश्वर दत्त यांनी कायदेमंडळात बाँब टाकले. या दोन कृत्यांबाबत भगतसिंग व त्यांच्या सहका-यांवर खटला भरण्यात येऊन २३ मार्च, १९३१ रोजी त्यांना फाशी देण्यात आली. भगतसिंग यांच्या या हौतात्म्यामुळे भारतीयांत देशप्रेमाची भावना वाढीस लागली.

भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास पाहताना प्रामुख्याने भगतसिंगांच्या क्रातिकारी कृत्यांकडे व हौतात्म्याकडे अधिक लक्ष दिले गेले आहे. ते सहाजिकच आहे. मात्र त्यामुळे भगतसिंग यांनी केलेल्या क्रांतीच्या मुलगामी चिंतनाकडे दुर्लक्ष झालेले आहे. त्याकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न या शोधनिबंधात करण्यात आला आहे.

**भगतसिंग यांचा व्यासंग :**

भगतसिंग हे बालपणापासून पुस्तके वाचण्यात गर्क असत. लाला लजपतराय यांनी स्थापन केलेल्या व्दारकादास ग्रंथालयाला त्यांनी अक्षरशः आपले घर बनविले होते.[२] वाचनाची ही आवड त्यांनी तुरूंगातही नेली. तिथेही आपल्या तारूण्याची जवळपास दोन वर्षे त्यांनी वाचनात घालवली. त्यांच्या कारावासातील रोजनिशीवरून आपल्याला त्याबद्दलची माहिती मिळते. कारावासात वाचलेल्या ब-याच पुस्तकांची त्यांनी टिपणे काढली आहेत.

खटल्यांच्या वेळी त्यांनी केलेले निवेदन, वृत्तपत्रे, मित्र व नातेवाईक यांना त्यांनी लिहिलेली पत्रे यातून त्यांच्या विचारांची ओळख होते. याशिवाय उपलब्ध माहितीवरून कळते की, त्यांनी कारावासात चार पुस्तके लिहीली आहेत. तुरूंगाबाहेर गुप्तपणे आणलेली ती चार पुस्तके गहाळ झाली. हौतात्म्य स्वीकारण्यापूर्वी त्यांनी लिहिलेली 'मी नास्तिक का आहे?' ही तुरूंगाबाहेर लपवून पाठवलेली पुस्तिका त्यांच्या वडिलांच्या हाती लागली. त्यांनी ती जून १९३१ मध्ये *द पीपल* या साप्ताहिकात प्रकाशित केली.[३] यातुनही त्यांचे मूलगामी चिंतन दिसून येते. यावरुन त्यांनी आपल्या छोट्याशा व दगदगीच्या आयुष्यात मोठा व्यासंग केला होता हे स्पष्ट होते. या उपलब्ध साहित्यातून स्वतंत्र भारताचे कसे होते हे त्यांच्या विचारांतुन पुढीलप्रमाणे जाणवते.

**भगतसिंग यांच्या दृष्टिने क्रांतीचा व्यापक अर्थ :**

ब्रिटिश राजवट नष्ट करून भारतीयांना स्वातंत्र्य मिळवून देणे, त्यासाठी रक्तपाती संघर्ष करणे, केवळ हाच क्रांतीचा अर्थ भगतसिंगांना अपेक्षित नव्हता. तर 'सर्व प्रकारच्या शोषणातून सर्व स्तरांतील लोकांची मुक्तता' असा व्यापक अर्थ त्यांना अभिप्रेत होता.[४] " उघडपणे दिसणा-या अन्यायावर आधारलेली सध्याची व्यवस्था बदलली पाहिजे हा आम्हाला अभिप्रेत असणारा क्रांतीचा अर्थ आहे. उत्पादक किंवा श्रमिक हे समाजाचे अत्यंत आवश्यक घटक असूनही शोषक त्यांच्या श्रमाला लुटतात आणि त्यांना त्यांच्या प्राथमिक हक्कापासूनही वंचित करतात. सर्वांसाठी धान्य उगवणारा शेतकरी हा आपल्या कुटूंबासह उपाशी राहतो, जागतिक बाजारपेठेला वस्त्रांचा पुरवठा करणा-या विणकराला आपले स्वःताचे व त्याच्या मुलाबाळाचे अंग झाकण्याएवढे वस्त्रदेखील नसते. भव्य महाल उभारणारे गवंडी, लोहार व सुतार वाळीत टाकलेल्या माणसासारखे झोपडपट्टयात राहतात. समाजाची बांडगुळे असणारे भांडवलदार व शोषक मन मानेल तसे कोट्यावधी रूपये उधळत असतात." असे विचार मांडून भगतसिंग वर्गिय शोषणाकडे आपले लक्ष वेधतात. या शोषणाला केवळ ब्रिटीश जबाबदार नसून उच्चवर्गिय भारतीयही जबाबदार आहेत, असे त्यांचे मत आहे. त्यामुळेच केवळ ब्रिटीश राजवट नष्ट करुन हे शोषण संपणारे नाही तर त्यासाठी समाजवादी क्रांती केली पाहीजे, असा त्यांचा आग्रह आहे. अशारितीने भगतसिंग यांना क्रंतीचा व्यापक अर्थ अभिप्रेत होता.

**सामाजिक विचार :**

सर्वप्रकारचे शोषण नष्ट करण्याचा विचार मांडत असताना भगतसिंग हे धार्मिक-सामाजिक व्यवस्थेतुन होणा-या शोषणाच्या मुळापर्यंत पोहोचलेले आपणास दिसतात. त्यातुनच त्यांनी जातीभेदाला विरोध दर्शविला आहे. जातीसंस्थेच्या माध्यमातूनही मोठ्याप्रमाणावर शोषण होत आहे, हे त्यांनी दाखवून दिले आहे. ब्राम्हणांकडून कनिष्ठ जातीतील लोकांना अज्ञानात ठेवण्यात आले आहे, त्यामुळे ते गरिबही राहीले आहेत अशाप्रकारचे विचार त्यांनी 'मी नास्तिक का आहे?' या पुस्तिकेत मांडले आहेत. [५] क्रांतिकारक भगतसिंग यांचा हा विचार सर्वसामान्य भारतीयांपर्यंत पाहोचलेला नाही किंवा पोहोचू देण्यात आला नाही.

**विवेकवादाचा आग्रह :**

समाजाची सर्वांगिन प्रगती होण्यासाठी भगतसिंग विवेकवादाचा आग्रह धरतात. "आपल्या प्रगतीसाठी सज्ज असलेल्या प्रत्येकाने जुन्या श्रद्धेतील प्रत्येक पैलूवर टीका करायला हवी; त्यावर अविश्वास दाखवायला व त्याला आव्हान द्यायला हवे. प्रचलित श्रद्धेचा प्रत्येक कानाकोपरा त्याने तर्काच्या आधारे शोधून काढायला हवा. त्याची चिकित्सा करायला हवी. विवेकदृष्ट्या बराच विचार केल्यावर जर त्याला एखाद्या सिद्धांतावर किंवा तत्वज्ञानावर विश्वास ठेवावासा वाटला तर त्याच्या श्रद्धेचे आपण स्वागत

करायला हवे." असे विचार त्यांनी 'मी नास्तिक का आहे?' पुस्तिकेत मांडले आहेत.[६] क्रांतिकारकांमध्ये एवढा मूलगामी विचार करणा-या भगतसिंगांचे उदाहरण विरळा आहे. या दृष्टिने केवळ क्रांतिकारकांतच नव्हे तर स्वातंत्र्य चळवळीच्या सर्वच प्रवर्तकांमध्ये वेगळे ठरतात.

**धार्मिक विचार :**

क्रांतिकारक हे धार्मिक वृत्तीचे होते आणि त्यांनी आपल्या विचारांच्या प्रसारासाठी धर्माचा व धार्मिक प्रतिकांचा मुक्तपणे वापर केला, अशी एक सर्वसाधारण समजूत आहे. मात्र भगतसिंग यांनी याचा वेगळया पातळीवरुन विचार केला. भगतसिंग यांनी ईश्वराचे अस्तित्व स्पष्टपणे नाकारले. एवढेच नव्हे तर याबाबतचे आपले विचार 'मी नास्तिक का आहे?' पुस्तिकेत रोखठोक मांडले आहेत. "ईश्वरावरील विश्वास, तसेच मूर्तिपूजा, धर्मविषयक संकुचित संकल्पना याविरुद्ध समाजाला लढा द्यायला हवा. त्याचप्रमाणे माणसाने स्वतःच्या पायावर उभे राहण्याचा प्रयत्न करायला हवा" असे सांगून ते सर्वांना वास्तववादी बनण्याचा आग्रह करतात.[७]

वयाच्या अवघ्या २३ व्या वर्षी भगतसिंगांना हौतात्म्य पत्करावे लागले. या छोट्या आयुष्यातही त्यांनी मूलगाती चिंतन केले हे त्यांच्या वरील विचारांतून स्पष्ट होते. किंबहूना भगतसिंगांच्या शौर्यपूर्ण कृत्यांपेक्षाही त्यांचे विचार अधिक क्रांतिकारी होते असे मला वाटते. त्यांच्या कार्याची ही बाजु अप्रकाशित आहे असा माझा दावा नाही. परंतु त्यांचे क्रांतिकारक विचार सर्वसामान्य भारतीयांपर्यंत तितक्या जोरकसपणे पोहोचलेले नाहीत किंवा पोहोचु देण्यात आले नाहीत. वर्ण-जातिव्यवस्था नष्ट करण्याचा व विवेकाचा आग्रह धरणारे विचार महात्मा ज्योतिराव फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर या आधुनिक भारतातील सामाजिक-धार्मिक क्रांतिकारकांच्या विचारांशी जुळणारे आहेत. स्वतंत्र भारताला दहशतवादी-क्रांतिकारकापेक्षा या सामाजिक-धार्मिक क्रांतिकारक भगतसिंगांची अधिक आवश्यकता आहे असे मला वाटते.

**संदर्भ :**

१. बिपन चंद्र व इतर, इंडियाज् स्ट्रगल फॉर इंडिपेंडन्स, के'सागर पब्लिकेशन्स, पुणे, २००६.
२. गुप्ता डी. एन. (संपा.), भगतसिंग निवडक भाषणे व लेखन, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, नवी दिल्ली.
३. कित्ता, पृ. ८.
४. भगतसिंग यांचे ६ लून १९२९ रोजीचे सत्र न्यायालयासमोरचे निवेदन.
५. भगतसिंग यांची 'मी नास्तिक का आहे?' ही पुस्तिका.
६. कित्ता, पृ. ५९.
७. कित्ता, पृ. ६५-६६.